अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

जा.क्र.अम / सका - १५ / २००८.
महानगरपालिका सचिव कार्यालय.
दिनांक : १४ -०८ -२००८.

अहमदनगर महानगरपालिकेच्या खास सभेची सुचना.

( मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये.)
सभा सुचना क्रमांक १५ , दिनांक २० -०८-२००८.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती............................................................

सदस्य / सदस्या, प्रभाग क्रमांक
अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

महोदय / महोदया,

यांस-

याद्वारे कळविण्यांत येते की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ - नियम क्र. १ (ह) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची खास सभा बुधवार दिनांक २०-०८-२००८ रोजी दुपारी १-०० वाजता महानगरपालिका सभागृहात सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्यांची विनंती करण्यांत येत आहे.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

सोबत : १. दि. १५-०३-२००८ च्या
व दि.१२-०५-२००८ च्या सभांचे इतिवृत्त.
२. विषयपत्रिका.
३. प्रस्तावाची टिप्पणी.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

सभा क्रमांक १५ दिनांक २०-०८ - २००८ रोजी दु. १.०० वां होणा-या मा.खास सभेची विषय पत्रिका.

-- *--

| विषय क्रमांक | विषय |
|---|---|
| १ | दिनांक १५-०३-२००८ व दि.१२-०५-२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा.सर्वसाधारण व मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत. |
| २ | दुखवटयाचे प्रस्ताव. |
| ३ | प्रभाग क्रमांक १२ झोपडी कँन्टीन जवळील माउली आर्केड ते टि.व्ही.सेंटर रस्त्यास " सेंट बिशप लॉईड रस्ता " असे नांव देणे बाबत मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांची दिनांक ३-०८-२००७ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ४ | प्रभाग क्रमांक ५ मधील इंम्पिरिअल चौका समोरील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथील चौकास " श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक " असे नामकरण करणे बाबत मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर, नगरसेवक यांची दि.७-०८-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ५ | प्रभाग क्रमांक १६ मधील शनिगल्ली झेंडिगेट भागातील ब्राम्हण कारंजा जवळील पैमाना हॉटेल ते पत्रकार मन्सुर शेख यांच्या घरापर्यंत रस्त्याला " पैगंबरवासी अजिजभाई चष्मावाला मार्ग " असे नांव देणे बाबत मा.श्री.बोरा किशोर हिम्मतलाल , नगरसेवक यांची दिनांक ९-०६-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट. |
| ६ | सन २००८ -२००९ सालाकरीता वृक्ष प्राधिकरण समितीची रचना करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर. |
| ७ | नविन टाटा नॅनो कार प्रकल्पासाठी आयात होणा-या यंत्रसामुग्री, कच्चा माल, स्पेअरपार्ट इ.साठी जकात माफी मिळणे बाबत कायनेटीक इंजिनिअरींग लि.,अहमदनगर यांचे दिनांक ३०-०६-२००८ रोजीचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर. |
| ८ | अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील मंजुर रेखांकनामधील ओपन स्पेस (मोकळया जागा ) हस्तांतरीत करून घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर. |
| ९ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : १४-०८-२००८.

नगर सचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दिनांक १५-०३-२००८ व दि.१२-०५-२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा. सर्वसाधारण व मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : दिनांक १५-०३-२००८ व दि.१२-०५-२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा. सर्वसाधारण व मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणेसाठी मा.खास सभेपुढे ठेविले.

--*--

**ठराव :** दिनांक १५-०३-२००८ व दि.१२-०५-२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा. सर्वसाधारण व मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : २ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : दुखवटयाचे प्रस्ताव.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : प्रभाग क्रमांक १२ झोपडी कँन्टीन जवळील माउली आर्केड ते टि.व्ही.सेंटर रस्त्यास " सेंट बिशप लॉईड रस्ता " असे नांव देणे बाबत मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांची दिनांक ३-०८-२००७ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मा.नगरसेवक श्री.जोशी अनंत सुर्यकांत यांनी टि.व्ही.सेंटर रस्त्यालगत ख्रिश्चन बांधवांची जवळ - जवळ चारशे घरे असुन सदर रस्त्यासाठी ख्रिश्चन समाजाने जागा उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे प्र.क्र.१२ झोपडी कँन्टीन जवळील माउली आर्केड ते टि.व्ही.सेंटर रस्त्यास " सेंट बिशप लॉईड रस्ता " असे नामकरण करणेबाबत सुचविलेले आहे.

सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर महानगरपालिका कडील रजिष्टर पाहता सदर रस्त्यास कोणाचेही नांव दिल्याचे आढळुन येत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड प्रकरण ११ (२) नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिके मध्ये विहीत असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देणेचे अधिकार मा.आयुक्तांना असलेने सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे ठेवणेकरीता सविनय सादर.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, " अ " प्रस्तावित महासभेपुढे ठेवणेसाठी मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " महासभा "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कार्यकारी अभियंता , शहर अभियंता , उपायुक्त (सा) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. जोशी अनंत सुर्यकांत

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : प्रभाग क्रमांक ५ मधील इंम्पिरिअल चौका समोरील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथील चौकास " श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक " असे नामकरण करणे बाबत मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर, नगरसेवक यांची दि.७-०८-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : प्र.क्र.५ मध्ये इंम्पिरियल चौकासमोर जुने एस.टी.स्टॅण्ड असुन येथे बाहेरगांवावरून प्रवासी येत जात असतात. तसेच सदरचा चौक हा नगर-पुणे महामार्गावर असुन शहरातील मुख्य रस्ता आहे. या चौकामध्ये ब-याच वर्षापुर्वीचा अश्वारूढ श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा उभारलेला आहे. या चौकास श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक असे नामकरण करणेबाबत मा.नगरसेवक श्री.भानुदास एकनाथ कोतकर यांनी दि.७-०८-२००८ रोजी यादी देवुन सुचविलेले आहे.

तसेच तत्कालीन नगरपरिषद अथवा महानगरपालिकेच्या दप्तरी पाहणी केली असता इम्पिरियल चौक असे नामकरण यापुर्वी कधीही झालेले नाही. सध्या इंम्पिरियल चौक म्हणतात.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड प्रकरण ११ (२) नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिके मध्ये विहीत असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देणेचे अधिकार मा.आयुक्तांना असलेने सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे ठेवणेकरीता सविनय सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, अवलोकनार्थ व मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, उपरोक्त प्रस्तावित नुसार सदरचा विषय हा मा.महासभेसमोर निर्णयार्थ ठेवणे योग्य सबब मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " मा.महासभेपुढे ठेवणे. "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट शहर अभियंता , उपायुक्त (कर) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. भानुदास एकनाथ कोतकर

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : प्रभाग क्रमांक १६ मधील शनिगल्ली झेंडिगेट भागातील ब्राम्हण कारंजा जवळील पैमाना हॉटेल ते पत्रकार मन्सुर शेख यांच्या घरापर्यंत रस्त्याला " पैगंबरवासी अजिजभाई चष्मावाला मार्ग " असे नांव देणे बाबत मा.श्री.बोरा किशोर हिम्मतलाल , नगरसेवक यांची दिनांक ९-०६-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : मा.नगरसेवक श्री.किशोर हिम्मतलाल बोरा यांनी प्र.क्र.१६ मधील शनीगल्ली, झेंडीगेट भागातील ब्राम्हण कारंजा जवळील पैमाना हॉटेल ते पत्रकार मन्सुर शेख यांच्या घरापर्यंत रस्त्याला " पैगंबरवासी अजिजभाई चष्मावाला मार्ग " असे नामकरण करणेबाबत सुचविलेले आहे. सदर रस्त्यास " शनिगल्ली " असे संबोधतात.

सार्वजनिक बांधकाम विभाग,अहमदनगर महानगरपालिका कडील रजिष्टर पाहता सदर रस्त्यास कोणाचेही नांव दिल्याचे आढळुन येत नाही.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूचि ड प्रकरण ११ (२) नुसार महानगरपालिकेच्या मंजुरीने महानगरपालिके मध्ये विहीत असलेला कोणताही रस्ता किंवा कोणतेही सार्वजनिक ठिकाणी नांव देणेचे अधिकार मा.आयुक्तांना असलेने सदरचे प्रकरण मा.महासभेपुढे ठेवणेकरीता सविनय सादर.

यावर कार्यकारी अभियंता यांचा अभिप्राय की, अहवालाप्रमाणे मान्यतेस तथा आदेशार्थ सादर.

यावर शहर अभियंता यांचा अभिप्राय की, मान्यतेस्तव सादर.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अ प्रस्तावित मा.महासभेकडे मंजुरीसाठी पाठविणे करीता मंजुरीस्तव सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, " मा.महासभेपुढे ठेवणे. "

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट कार्यकारी अभियंता , शहर अभियंता , उपायुक्त (कर) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : सन २००८ -२००९ सालाकरीता वृक्ष प्राधिकरण समितीची रचना करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : अहमदनगर महानगरपालिका हद्यीमध्ये झाडांचे जतन व संरक्षणा करीता महाराष्ट्र शासनाचे राजपत्रामध्ये सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे ) झाडांचे जतन अधिनियम १९७५ अन्वये दि. ८ जानेवारी १९९६ रोजी प्रसिध्द झालेल्या महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे ) झाडांचे जतन ( सुधारणा ) अधिनियम १९९५ अनुक्रमणिका ५ अ पोट कलम २ स्तंभ २ अन्वये मा.आयुक्त साो. हे वृक्षप्राधिकरणाचे अध्यक्ष आहेत. तथापि सन २००३ पासुन आजतागायत वृक्ष समिती पासुन वृक्ष प्राधिकरणा पर्यंत आहे तेच सदस्य असुन नियमाप्रमाणे दरवर्षी प्राधिकरणाची रचना करण्यास पाहिजे. तथापि महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे ) झाडांचे जतन ( सुधारणा ) अधिनियम १९९५ अन्वये मा.आयुक्त साो.हे प्राधिकरणाचे सभापती असुन तेच या प्राधिकरणाचे ट्री ऑथर्टी आहे. त्यामुळे सन २००८-२००९ या सालाकरीता नविन प्राधिकरण समिती स्थापन करणे आवश्यक आहे. त्याकरीता जुनी कार्यकारणी बदलुन नविन कार्यकारणी स्थापन करणे बाबत खालील प्रमाणे सदस्य निवडणे आवश्यक आहे.

१. नॉन ऑफिसियल ऑर्गनायझेशन ज्यांना प्रत्यक्ष झाडे लावण्याचा व जगविण्याचा अनुभव आवश्यक आहे यापैकी तीन मान्यवर घेणे आवश्यक आहे.
२. सरकारी अधिकारी पैकी १. वन विभागाचे प्रमुख.
३. उपसंचालक सामाजिक वनीकरण हे सदस्य घेवुन उर्वरित महानगरपालिकेचे सदस्य व अधिकारी घेवुन एकुण सदस्य संख्या पंधरापेक्षा जास्त घेणे नाही. यामध्ये महानगरपालिकेचे उपायुक्त, प्रशासनाधिकारी, प्रसिध्दी प्रमुख , नगर रचनाकार यांचा समावेश असुन मा.आयुक्त साो.ठरवील त्यांना वृक्षप्राधिकरणामध्ये समावेश करणे योग्य राहील.

सोबत : महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे ) झाडांचे जतन अधिनियम १९९५ जोडला आहे.

यावर मा.उपायुक्त (कर )यांचा अभिप्राय की, उपरोक्तनुसार वृक्षप्राधिकरण समितीसमोर निर्णयार्थ ठेवणेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब यांचा अभिप्राय की, महाराष्ट्र ( नागरी क्षेत्रे ) झाडांचे जतन अधिनियम १९७५ चे कलम ३ नुसार वृक्ष प्राधिकरण महासभेच्या मंजुरीने तयार करावे.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, टिप्पणीसह महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.उपायुक्त (कर ) , मा.आयुक्त साहेब व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेनुसार सदर समितीवर सदस्य निवडणे बाबतचे अधिकार मा.महापौर ,अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. किशोर डागवाले

अनुमोदक : मा.श्री.नामदेव पवार

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : नविन टाटा नॅनो कार प्रकल्पासाठी आयात होणा-या यंत्रसामुग्री, कच्चा माल, स्पेअरपार्ट इ.साठी जकात माफी मिळणे बाबत कायनेटीक इंजिनिअरींग लि.,अहमदनगर यांचे दिनांक ३०-०६-२००८ रोजीचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर.

--*--

प्रस्तावाचा मजकुर : विनंती रिपोर्ट देण्यांत येतो की, मे.कायनेटीक इंजि. लि., अहमदनगर यांनी कंपनीच्या (नॅनो कारचे ) नवीन प्रकल्प संदर्भातील जकात माफी सवलत मिळणेबाबत दि.४-७-२००८ रोजी अ.नगर महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या दि. ३० . ६. २००८ चे पत्रामध्ये खालील बाबी नमुद केल्या आहेत.

१. कायनेटीक इंजिनिअरींग लिमीटेड या कंपनीने सन १९७२ मध्ये अहमदनगर शहरात पहिला मोठा औदयोगिक प्रकल्प सुरु केला. त्यावेळी अहमदनगर शहरात औदयोगिक प्रकल्प जवळ जवळ अस्तित्वात नव्हते. सामान्य माणसासाठीच्या दुचाकीचे उत्पादन सुरु केले आणि सायकलीची जागा लुना मोपेडने घेतली. या प्रयत्नाने अहमदनगर शहराला लुना सिटी अशी ओळख करुन दिली आणि अहमदनगर शहरात उदयोगाचा पाया घातला गेला. त्यानंतर शहरात व एमआयडीसीमधे सुमारे २०० छोटे मोठे औदयोगिक उदयोग सुरु झाले.

२. राष्ट्राची आर्थिक प्रगती आणि अर्थव्यवस्थेचे खुलीकरण यामुळे सामान्य माणसाची गरज मोपेड सारख्या छोटया वाहनापासून मोटरसायकल सारख्या मोठया वैयक्तिक वाहनात परावर्तीत झाली. या मुलभूत बदलामुळे प्रकल्पाच्या वाढीवर निर्बंध आले. तरी सुध्दा १९७६ ते २००८ या काळात कंपनीने अहमदनगर नगरपालिकेला जवळ जवळ ३० कोटी रुपयांचा जकात कर भरला आहे.

३. कंपनीचे मुख्य प्रर्वतक (फिरोदिया कुटुंब) यांचे अहमदनगर शहराशी विशेष जिव्हाळयाचे नाते आहे. या कठीण परिस्थितीत इतर ठिकाणी संधी उपलब्ध असतानासुध्दा अहमदनगर शहरातील मोठया उदयोगापैकी एक उदयोग म्हणून टिकून राहण्याच्या दृष्टीने व ऑटोमोबाईल उत्पादन क्षेत्रातील ख्याती सांभाळण्यासाठी कंपनीने अहमदनगर शहरात उदयोग चालू ठेवला. उद्दिष्टे साध्य करण्यासाठी कंपनीला सतत झगडावे लागत आहे.

४. वरील उदिदष्टांच्या पूर्तीसाठी कंपनीने 'ऑटोमोबाईल पार्टस्' उत्पादित करण्याच्या उदयोगात उतरण्याचे धाडस केले आहे. तसेच आमच्या कंपनीची 'टाटा मोटर्स, पुणे' यांनी त्यांच्या नवीन नॅनो कारचे गिअर्स पुरविण्यासाठी एकमेव पुरवठादार म्हणून नेमणूक केलेली आहे. त्यांचे हे नवीन उत्पादन फक्त भारतीय ग्राहकांनाच आकर्षित करणारे नाही तर जगभराच्या सामान्य ग्राहकांना त्यांना परवडणा-या किंमतीत, स्वतःचे कौटुंबिक वाहन (मोटारगाडी) मिळण्याचे साधन बनणार आहे.

सदर कंपनीने नुकत्याच उत्पादनाच्या केलेल्या प्रथम ओळखीनंतर भारतीय वृत्तपत्रात आलेली कात्रणे सोबत जोडली आहेत. (भाग अ) कंपनीची नवीन उपक्रम चालू करण्याची क्षमता व कमी दरात उत्पादन करण्याचा आत्मविश्वास, या गुणांवरच वरील नवीन उत्पादनाचा प्रमुख भागाचा पुरवठा करणारे एकमेव पुरवठादार होण्याचा बहुमान कंपनीला मिळाला आहे.

५. भारतीयांना कमी किंमतीचे, उच्च दर्जाचे उत्पादन उपलब्ध करुन देण्याच्या उदिदष्ट पूर्तीसाठी, कंपनी सदर (मोटार गाडीच्या) भागाची वाढती मागणी परिणामकारक कमी खर्चात करु शकेल असा कंपनीला आत्मविश्वास आहे.

६. सदर उत्पादन प्रकल्पासाठी कंपनीला सन २००८-२००९ या वर्षासाठी रु.६० करोडची अतिरिक्त गुंतवणूक आवश्यक आहे.

सदर नॅनो गिअर व शाफ्ट उत्पादनासाठी खाली नमूद केलेला कच्चा माल शहरात आणणे आवश्यक आहे.

अ) फोर्जिग्ज ,ब) टर्न ब्लॅन्क, क) विविध प्रकारचे ऑईल्स ,ड) पॅकिंग मटेरियल, प्लॅस्टीक ट्रे व बीन (Returneble) ,इ) नवीन मशिनकरिता स्पेअरपार्टस व इक्वीपमेंटस.

७. सन २००९ ते २०१० रु. ६० करोड व २०१० ते २०११ रु. ६५ करोड चे उत्पादन नविन प्रकल्पाकरीता अपेक्षीत आहे. ऑटो कांपोनंट बनविणा-या इंड्स्ट्रीजच्या बाबतीत (मालाची किंमत ) ६५ % असते .

८ . नॅनो प्रकल्पाचे उद्दीष्ट लक्षात घेता किंमत कमी ठेवणे तरीही तंत्रज्ञान व दर्जा उच्च ठेवणे ही तारेवरची कसरत आम्हाला करावी लागणार आहे.

९ . सध्या शहरात आयात होणा-या मशिनवर अ.नगर महानगरपालिका जकात नियम अनुसुची एक अनुक्रमांक ७४ प्रमाणे ३ ट्क्के जकात दर आकारत आहे. तसेच अ.नगर महानगरपालिका जकात नियम अनुसुची एक मध्ये शेवटी दर्शविल्याप्रमाणे आयात होणा-या कच्च्या मालावर एक ट्क्के प्रमाणे जकात दर आकारत आहे.

१०. मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ सेक्शन २ (४२) नुसार शहरात आयात होणारा माल हा उपभोग ,उपयोग व विक्री करीता आला असेल तर त्यावर जकात कर महानगरपालिका आकारु शकते.

सेक्शन ९९ नुसार महानगरपालिकेला दर ठरविण्याचा अधिकार आहे. त्यामध्ये ० टक्के दर समाविष्ट आहे. त्याचा संदर्भ सेक्शन १२७ (२) मध्ये देण्यात आला आहे. त्यानुसार जकात दर हा ० असु शकतो. जकात कर प्रॉपर्टी कराप्रमाणे अनिवार्य नाही हे सेक्शन ९९ मध्ये नमुद केले आहे.

शहराचे विकासाकरीता महानगरपालिका जकात माफी देवु शकते .

११. या सर्व गोष्टीचा सहानुपुर्वक विचार करुन आयात होणारे यंत्रसामुग्री , मशिनरी पार्ट , कच्चा माल इ. यांना जुलै २००८ पासुन पुढे पाच वर्षे जकात माफी मिळावी . टाटा मोटर्स करीता लागणारे उत्पादनाचे उद्दीष्ट हे ऑगष्ट २००८ पासुन आहे. आणी त्याकरीता लागणारा कच्चा माल , यंत्रसामुग्री , स्पेअर पार्टस जुलै २००८ पासुन आम्हास आयात करावे लागणार आहे.

१२. अ) नॅनो प्रकल्पाबाबतचे उद्दीष्ट हे सामान्य माणसाला वाजवी किंमतीमध्ये मोटारगाडी देण्याचे आहे. म्हणुन येथील प्रकल्प हा मालाच्या दर्जाशी काही तडजोड न करता कमीतकमी किमतीत प्रत्येक भाग पुरविण्याचा प्रयत्न आहे. त्याकरीता ज्या घटक भागाचे आम्ही उत्पादन करणार आहोत त्याच्या कच्च्या मालावर १ ट्क्का सुद्धा जकात असु नये.

हा केवळ कायनेटीक इं. लि. व टाटा मोटर्स चे बाबतीत मर्यादीत विषय राहणार नसुन संपुर्ण देशाच्या कौतुकाचा प्रकल्प होईल.

ब) कायनेटीक इंजिनियरींग लि. मध्ये आयात होणारा कच्चा माल हा मुल्यवर्धीत होऊन शहराबाहेर विकला जाणार आहे. तेव्हा अधि. सेक्शन २ (४२) नुसार व इतर लागु होणारे कलमाप्रमाणे यावर जकात लावु नये.

जकातीला वॅट करामध्ये सेटॉफ मिळत नाही . करावर कर टाळणे हे आता आवश्यक झाले आहे. अबकारी कर , विक्रीवर वगैरे सर्व कर आता एकाच कराच्य कक्षेत येणार आहेत तेव्हा नविन करपद्धती नुसार महानगरपालिका कर सवलतीकरीता आम्हांस मदत करु शकते.
क) आमच्या कंपनीत तयार होणा-या मालाची किंमत आयात मालापेक्षा बरीच जास्त असेल त्यामुळे जकातीवर सुट देणे हे संयुक्तीक ठरेल .
ड) सध्या आमचे कंपनीत अंदाजे ८५० कामगार काम करतात . ऑटोमोबाईल बाजार पेठेत होणा-या बदलानुसार आम्हास आमचे सध्याचे उत्पादन व नविन प्रकल्पानुसार होणारी उत्पादने यांचा मेळ घालताना कामगारांच्या इच्छा आकांक्षा नुसार पाठिंबा मिळविणे अवघड जाते . महानगरपालिकेची जकात सवलतीची मदत आमचे उद्दीष्ट साध्य करण्यासाठी तसेच वाजवी किंमतीचे ध्येय गाठण्याकरीता ८५० कामगारांना रोजगार मिळुन देण्यात फक्त हातभार लावणार असुन नविन संधी नगर शहरामध्ये उपलब्ध होऊन लोकंना अनेक प्रकारचे रोजगार मिळु शकतील
इ) आमच्या नविन प्रकल्पानुसर शहरामध्ये एक नविन प्रकारचा विचार , वेगळे वातावरण ,नविन गुंतवणुक होण्यास मदत होईल.
उदाहरण द्यायचे झाल्यास पुणे जिल्ह्यात चाकण व सणसवाडी करीता काही सवलतीचा विचार होऊन अनुकुल कर पद्धती आमलात आणल्यामुळे तेथे चांगल्या प्रकारचा विकास होऊन वरच्या दर्जाचे औद्योगीक जाळे निर्माण झाले आहे. त्याप्रमाणे आमच्या सारख्यांना ,ज्यांची नगर शहराशी ऐतीहासीक व भावनीक गुंतवणुक आहे त्यांना महानगरपालिकेने संधी उपलब्ध करुन व पाठिंबा देवुन नगर शहरच विकास करुन घ्यावा.
फ) महनगरपालिकेचे जकातीसारखे कर इतरांशी तुलना करतान जास्त ठरल्यास प्रकल्प शहराच्या हद्दीबाहेर नेण्याची गरज निर्माण होते. जे उद्योग शहरामध्ये आहेत त्यांच्यावर शहराबाहेरील उद्योगापेक्षा जास्त बोजा पडल्यास एक असमतोल निर्माण होतो.
ग) न्ज़ियोजीत प्रकल्प हा नविन असल्यामुळे सध्यातरी महानगरपालिकेच्या कर पद्धतीचा भाग नाही आणी जकातीच्या माफीमुळे प्रकल्पाची उभारणीनंतर शहराकरीता भरपुर कर देणारा प्रकल्प होऊ शकतो. हा महानगरपालिकेच पाठिंबा आम्हांस मदतीचा होईल तसेच कार करीता पार्टस पाठविणारा जगात प्रसिद्ध प्रकल्प होईल .
काही तांत्रीक कारणांमुळे म.न.पा. पुर्ण जकात माफी देवु शकत नसेल तर आमची अशी विनंती आहे की, अंशतः जकात आकारावी की जेणेकरुन आमची उद्दीष्टे साध्य करता येतील .
अ.नगर मध्ये कायनेटीक इं.लि. चे माध्यमातुन मोठी संधी निर्माण झाली आहे. यातुन भविष्यात नगरच्या औद्योगीक क्षेत्राला नवी दिशा मिळेलच तसेच रोजगारही निर्माण होईल.
आम्ही आपणांस विनंती करतो की , टाटा मोटर्स करीता गिअर व शाप्टला लागणारी यंत्रसामुग्री , कच्चा माल इ. आयात करताना जुलै २००८ नंतर पुढे पाच वर्षे जकात माफी मिळावी . आम्हांस विश्वास आहे की आपण आम्हास जी जकात माफी द्याल ती शहराच्या औद्योगीक विकसच्या दृष्टीने दिशा देणारी ठरेन या प्रकल्पास वरील प्रमाणे जकात सवलत उपलब्ध न झाल्यास नाईलाजास्तव हा प्रकल्प आम्हास सिंगुर (कोलकाता) येथे उभा करावा लागेल.
नविन प्रकल्पाविषयी पुर्ण माहीती देण्याविषयी मिटींगकरीता वेळ व तारीख कृपया द्यावी त्यावेळेस आपणांस सर्व माहीती देवुच.` असे नमुद केलेले आहे.

कायनेटीक इंजिनियरींग कं.लि. अ.नगर यांचे उपरोक्त पत्राचे अनुषंगाने प्रस्तुत प्रकल्पाबाबत चर्चा करणेसाठी दि. ४.७.०८ रोजी स. ११.३० वा. मा. आयुक्त साहेब यांचे दालनात बैठक आयोजीत करण्यात आलेली होती . परंतु सदर दिवशी मा. आयुक्त साहेब यांना कार्यालयीन कामास्तव मुंबई येथे तातडीने जावयाचे असल्याने सदरची बैठक दि. १.८.०८ रोजी स.११.३० वा.

आयोजीत करण्यात आली होती. सदर बैठकीस खालील प्रमाणे अ.नगर महनगरपालिकेचे पदाधिकारी व अधिकारी तसेच कायनेटीक इंजिनियरींग लि. चे चेअरमन व इतर प्रतिनिधी उपस्थीत होते.

| अ.नं. | अधिकारी | अ.नं. | पदाधिकारी |
|---|---|---|---|
| १ | मा.श्री.कल्याण केळकर, आयुक्त | १ | मा.श्री.संदीप कोतकर, महापौर |
| २ | मा.श्री.अच्युतराव हांगे, उपायुक्त (सा) | २ | मा.श्री.दिपक सूळ, उपमहापौर |
| ३ | मा.डॉ.श्री. पंकज जावळे, उपायुक्त (कर) | ३ | मा.श्री.अविनाश घुले, सभापती,स्थायी समिती |
| ४ | | ४ | मा.श्री.किशोर डागवाले, सभागृह नेता |
| ५ | मा.श्री.पी.आर.गोरे, अंतर्गत लेखापरीक्षक | ५ | मा.श्री.नामदेव पवार, विरोधी पक्ष नेता |
| ६ | मा.श्री.आर.ए.देशमुख, सहाय्यक आयुक्त | ६ | मा.श्री.अरूण फिरोदिया, चेअरमन, कायनेटीक इंजि.लि., |
| ७ | मा.श्री.एन.एम.पवळे, जकात अधिक्षक | ७ | मा.श्री.एम.के.खेरा, मॅनेजिंग डायरेक्टर, कायनेटीक इंजि.लि., |
| ८ | मा.श्री.एम.एल.डवरे, सहा.जकात अधिक्षक | ८ | मा.आर.एच.चौडकी, सिनियर जनरल मॅनेजर, कायनेटीक इंजि.लि., |
| ९ | श्रीमती.निलीमा बंडेलू, प्रसिध्दी तथा जनसंपर्क अधिकारी | ९ | मा.श्री.जयंत येलुलकर, प्रतिनिधी, कायनेटीक इंजि.लि., |
| | | १० | मा.श्री.संजयकुमार लोंढे, नगरसेवक |
| | | ११ | मा.श्री.कैलास गिरवले, नगरसेवक |

सदर बैठकीत खालील प्रमाणे चर्चा झाली .

सुरुवातीस श्री.जयंत येलूलकर प्रतिनिधी कायनेटीक इंजि.लि., यांनी प्रास्ताविक केले व सांगितले की, कायनेटीक इंजि.लि., ही या कंपनीच्या वतीने लुना मोपेडचे औद्योगिक उत्पादनामध्ये मोठे नांव आहे. या कंपनीने टाटा कंपनी मार्फत होणा-या भारतीय बनावटीच्या नॅनो कार मध्ये कायनेटीक इंजि.लि., यांनी मोठया प्रमाणात भाग घेतला आहे. व याचे उत्पादन नगरमध्ये होणार असल्याने शहराचा औद्योगिक विकास होवून औद्योगिक क्रांती होणार आहे.

फिरोदिया कुटुंब अहमदनगरचे असल्यामुळे त्यांनी सदर कामी अहमदनगर शहराचा विचार केलेला आहे. व त्यामध्ये कंपनीतर्फे आयात होणा-या मशिनरी व कच्चा माल यावर जकात माफी मिळणेसाठी अहमदनगर महानगरपालिकेने सकारात्मक भुमिका घेतलेली आहे. त्यामध्ये महानगरपालिकेने विचार करुन जकात माफीसाठी मंजूरी देण्यासाठी आज जी प्राथमिक चर्चा (मिटींग) आयोजित करण्यांत आली. त्यासाठी मी कायनेटीक इंजि.लि., चे वतीने सर्व अधिकारी व पदाधिकारी यांचा आभारी आहे.

त्यानंतर कायनेटीक इंजि.लि., यांचे नविन प्रकल्पा संदर्भात जकात माफी मिळण्याचे दि.३०/०६/२००८ रोजीचे पत्र व त्यातील मजकूर सदर मिटींगमध्ये सर्वासमक्ष जकात अधिक्षक यांनी वाचून दाखविला व प्रस्ताव चर्चेसाठी ठेवला ,

मा.चेअरमन, कायनेटीक इंजि.लि., यांनी सांगितले की, टाटाच्या नवीन कार प्रकल्पा बाबत आम्ही स्वतः मा.श्री.रतन टाटा यांची भेट घेतली आहे व टाटा उद्योग समुहाच्या वतीने जी स्मॉल कार कल्पना होती त्याची मुळ कल्पना ही कायनेटीक कंपनीची होती. त्यामुळे या स्मॉल कारचे गिअर बॉक्स बनविण्याचे काम कायनेटीक इंजि.लि. ला मिळावे अशी विनंती केली. व त्याप्रमाणे त्यांनी विनंती मान्य केली आहे. व हे काम आम्ही करणार आहोत. त्यासाठी मशिनरी आयात केली

जाणार आहे. त्यावर व उत्पादीत होणा-या गिअरबॉक्स साठी लागणा-या कच्च्या मालावर आम्हांस संपूर्ण जकात माफी मिळावी असे सुचविले.

मा.आयुक्त यांनी सांगितले की, महानगरपालिका जॉब वर्कवर सध्या मजूरीच्या किंमतीवर ३ टक्के जकातीची आकारणी करते त्याप्रमाणे कायनेटीक इंजि.लि., जॉबवर्क करणार आहे काय. जॉबवर्क असल्यास त्यावर स्थायी आदेश २००५ मधील नियम २१ (१८) अन्वये आकारणी होते. व त्याच्या अटी व शर्ती वाचून दाखविण्यांत आल्या.

मा.महापौर यांनी सांगितले की, कायनेटीक इंजि.लि.मार्फत गिअर बॉक्स तयार करण्याकरीता मशिनरी व स्पेअर पार्टस आयात होणार आहे त्यावर जकात माफी मिळणे बाबतकंपनीची मागणी आहे. तसेच दुसरी कंपनी मार्फत जॉबवर्क करणार किंवा कसे त्यावर चेअरमन कायनेटीक इंजि.लि., यांनी सांगितले की, जॉबवर्क न करता पूर्ण गिअरबॉक्सचे उत्पादनच कायनेटीक इंजि.लि., मार्फत होणार आहे व त्यासाठी कच्चा माल (रॉ मटेरियल) मागवावे लागणार आहे. त्यावर जकात माफीची अपेक्षा आहे. त्यावर मा.महापौर यांनी सदर बाबत सविस्तर प्रस्ताव तयार करुन मा.महासभेपुढे ठेवण्यांत यावा व त्यावर महासभा निर्णय घेईल असे सूचविले.

मा.श्री.नामदेव पवार यांनी सुचविले की, आम्ही महासभेपुढे सदर प्रस्ताव घेवूच परंतु कायनेटीक इंजि.लि., कंपनीच्या वतीने कशा प्रकारे जकात माफी अपेक्षित आहे. त्याबाबत महानगरपालिकेकडे प्रस्ताव द्यावा.

त्याचप्रमाणे उपमहापौर श्री.दिपक सूळ यांनी कायनेटीक इंजि.लि., कंपनीने संपूर्ण भुमिका प्रस्तुत करावी असे सूचविले.

चेअरमन कायनेटीक इंजि.लि., यांनी खुलासा केला की, नॅनो प्रकल्पाचे गिअरबॉक्स बनविणे हा एक नविन प्रकल्प असल्याने व यासाठी लागणारी मशिनरी अंदाजे ७० कोटींची असल्यामुळे महानगरपालिकेने केवळ नॅनो प्रकल्पासाठी संपूर्ण जकात माफ करावी किंवा नाममात्र जकात लावण्यांत यावी. व औद्योगिक विकासास चालना द्यावी असे सूचविले.

मा.आयुक्त कायनेटीक इंजि.लि., च्या नविन प्रकल्पामध्ये नविन ८५० लोकांना रोजगार मिळणार आहे असे त्यांनी सांगितले आहे. यामुळे नगरचा औद्योगिक विकास होवू शकेल यात शंका नाही. कायनेटीक इंजि.लि., ही जॉबवर्क न करता गिअरबॉक्स साठी रॉ मटेरियल घेणार आहे.

मा.उपमहापौर वरील नविन प्रकल्पासाठी येणा-या मशिनीवरील जकात माफ करण्यासाठी फक्त विचार करु शकतो मात्र नंतर होणारे जॉबवर्क वर जकात माफी बाबत विचार करता येवू शकणार नाही.

यावर उपायुक्त सा यांनी सुचविले की, कायनेटीक इंजि.लि., कंपनीला ५ वर्षासाठी जकात माफी दिल्यानंतर पुढील २५ वर्षे हा प्रकल्प अहमदनगरमध्येच ठेवू व इतरत्र हलविणार नाही. अशा प्रकारची हमी कंपनी देणार आहे काय अशी विचारणा केली. यावर चेअरमन कायनेटीक इंजि.लि., यांनी सांगितले की, आम्ही आमच्या जागेतच हा प्रकल्प सुरु करत आहोत अन्यथा एम.आय.डी.सी. किंवा इतरत्र आम्हास जागा मिळत होती परंतु आम्ही तो विचार केलेला नाही. व नगरशहर हीच आमची जन्म आणि कर्म भूमी असल्यामुळे हा प्रकल्प इथेच कार्यान्वीत करण्याची आमची इच्छा आहे.

महापौर यांनी यावर सांगितले की, कायनेटीक इंजि.लि., ची इच्छा नगरशहराची आहे तथापि ते रांजणगांव ते सुपा किंवा एम.आय.डी.सी येथे जावू शकतात.

यावर चेअरमन यांनी सांगितले की, आम्हास ५ वर्षाची संपूर्ण जकात माफी दिल्यास अहमदनगर शहराचा कायापालट होईल. व कारखानदारी निर्माण होईल. या प्रकल्पाच्या उत्पादनास एवढी मागणी वाढणार आहे की, अहमदनगर शहराचा इतिहासच बदलून जाणार आहे.

यावर मा.महापौर यांनी सूचविले की, कायनेटीक इंजि.लि., यांची मागणी विचारात घेता अशा प्रकारची मशिनरी अहमदनगर शहरात आलीच नाहीतर महानगरपालिकेला काहीच जकात मिळणार नाही. कंपनी भविष्यामध्ये ८५० लोकांना रोजगार देणार आहे. व हा कर्मचारी वर्ग नगर शहरातच राहणार असल्याने व त्यांना मिळणारा पैसा हा नगर शहरातच खर्च होणार असल्याने पर्यायाने अहमदनगर शहराचाच विकासात्मक फायदा होईल. त्यामुळे अहमदनगर शहरातच कंपनीचा प्रकल्प सुरु व्हावा अशी सर्वांची भावनिक इच्छा आहे. व तशी भुमिकाही आहे.

मॅनेजिंग डायरेक्टर श्री.खेरा यांनी सविस्तर माहिती देतांना सांगितले की, टाटा कंपनीनी गिअर बॉक्स बनविण्यासाठी कायनेटीक इंजि.लि., ची प्राधान्याने निवड केलेली आहे. सदर प्रकल्प उभा करण्यसाठी वास्तविक कायनेटीक इंजि.लि., ला कलकत्ता सिंगूर येथे ५ एकर जागाही मिळाली आहे. जागा जवळ घेण्याबाबत टाटा कंपनीने कंडिशनही आम्हास टाकलेली आहे. तथापि अहमदनगर शहराबाबत मा.फिरोदिया कुटुंबियांचा एक भावनिक संबंध लक्षात घेवून यापुर्वी जी लुना मोपेड उत्पादन केले होते. त्या उत्पादनाने औद्योगिक क्षेत्रात क्रांती केलेली होती व दुर्देवाने सध्या लुना मोपेडचा खप कमी झालेला आहे मात्र त्याचसारखी औद्योगिक क्रांती नॅनो कार उत्पादनाच्या रुपाने होत आहे. व अशा प्रकारे सालाना १० लाख कार्सचे उत्पादन अपेक्षित आहे. टाटा कंपनीचे जे ५२ सप्लायर्स आहेत त्यामध्ये कायनेटीक इंजि.लि., चा मोठा वाटा आहे. सिंगूर कलकत्ता मध्ये ज्या फॅसिलिटी मिळणार आहेत त्या फॅसिलिटी आपण याठिकाणी देणार आहात त्यामुळे नगर शहराचे नाव मोठे होणार आहे. ज्याप्रमाणे पिंपरीचिंचवड औद्योगिक शहर म्हणुन नावारुपाला आलेले आहे. त्याचप्रमाणे नगरशहराचेही नाव औद्योगिक शहर म्हणुन होईल. व याचे श्रेय नॅनो कंपनी व कायनेटीक कंपनीला मिळणार आहे. त्याचप्रमाणे इतरही मोठ्या कंपन्या नगर शहरात येवू शकतील त्यामुळे अहमदनगर महानगरपालिकेचे याबाबतीत उत्तरदायित्व आहे. त्यामुळे कायनेटीक इंजि.लि., यांना मशिनरी आणावयाची असल्यामुळे त्वरीत अंतरिम आदेश द्यावेत की जेणेकरुन आम्ही मशिनरी आणू शकतो.

यावर मा.महापौर यांनी सांगितले की, महानगरपालिकेच्या सभेपुढे सदरचा विषय घेवून त्यास मंजूरी मिळाल्यानंतर सदरचा प्रस्ताव अंतिम मंजूरीसाठी मे.महाराष्ट्र शासनाकडे पाठवावा लागेल व त्यांची मंजूरी मिळाल्यानंतरच माफी देता येईल. तोपर्यंत कंपनीने जॉईंट अकौंटमध्ये रक्कम भरावी असे सूचविले.

तथापि मा.चेअरमन कायनेटीक इंजि.लि., यांनी ते मान्य न करता आम्ही मशिनरी परत पाठविण्याच्या अटीवर आयात करु. (रिटर्नेबल)

तथापि मा.महापौर यांनी सांगितले मनपाचा ठराव पाठविल्यानंतर १५ दिवसांत मे.शासनाची मंजूरी मिळू शकेल. नॅनो प्रकल्पा बाबत विशेष बाब म्हणुन जकात माफी देण्याबाबत ठराव सभेपुढे मांडण्यात येईल असे सांगितले.

आयुक्त यांनी कायनेटीक इंजि.लि., थकीत असलेले प्रॉपर्टी टॅक्स बाबत एकत्रित बसून त्याबाबतचा प्रश्न मिटवावा असे मा.चेअरमन कायनेटीक इंजि.लि., यांना सूचविले असता त्यावर आपण पुन्हा स्वतंत्र बसून त्यावर चर्चा करु असे सांगितले.

सर्व संबंधितांचे आभार मानुन सदरची मिटींग समाप्त झाली.

सदर बैठकीत झालेल्या चर्चेनुसार टाटा कंपनीची नविन नॅनो कार प्रल्कल्पासाठी कायनेटीक इंजिनियरींग कं.लि. अ.नगर ह्या कंपनीत गियर बॉक्स तयार करणेसाठी आवश्यक लागणारी यंत्र सामुग्री , कच्चा माल , व स्पेअर पार्टस या आयात होणा-या मालावर जकाती मधुन

सुट देणे बाबत धोरणात्मक निर्णय घेणेसाठी सदरचा विषय महासभेपुढे घेणे विषयी योग्य त्या आदेशार्थ सविनय सादर .

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, " अ " प्रमाणे मान्यतेस्तव.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, मा.महासभेपुढे निर्णयास्तव ठेवणे योग्य.

यावर मा.उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, प्रस्तावित नुसार मा.महासभेसमोर सदरचा विषय धोरणात्मक स्वरूपाचा असल्या कारणाने निर्णयार्थ ठेवणे योग्य.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, महासभेपुढे ठेवणे.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मुख्यलेखापरिक्षक , मुख्यलेखाधिकारी , मा.उपायुक्त (कर) व मा.महापौर साहेब यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

-- * --

विषय क्रमांक : ७ :- जकात माफी संदर्भात.

मा.श्री.त्रिपाठी :- सदरचा विषय महानगरपालिका सभेपुढे घेण्यांत आल्याबद्दल हार्दिक अभिनंदन करतो. सन १९७३ सालापासुन ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये दुष्काळी परिस्थिती होती अशा कालावधीमध्ये कायनेटीक इंजिनिअरींग यांनी लुना मोपेडच्या उत्पादनाच्या कारखान्याचे उद्घाटन केले. कायनेटीक कंपनी लुना मोपेडचे उत्पादन करीत असतांना केवळ या कंपनीच्या जकात रक्कमेवर तत्कालीन नगरपरिषदेच्या कर्मचा-यांचे पगार अवलंबुन होते. कायनेटीक कंपनी ही अखिल भारतात प्रसिध्द होती. या कंपनीचे भाउसाहेब फिरोदिया हे विधानसभेचे सभापती होते. अशा कंपनीला आता महानगरपालिके कडे त्यांच्या नविन नॅनो कार गिअर बॉक्ससाठी जकात माफी मिळण्या बाबत विनंती करावी लागत आहे. अहमदनगर शहराचा औद्योगिक विकास होण्यासाठी यापुर्वी हिरोहोंडा प्रकल्पही नगरमध्ये येणार होता परंतु तो प्रकल्प दुसरीकडे गेला. कायनेटीक कंपनीने संकट काळातही शहराला मदतच केलेली आहे. त्यांना जकात माफी दिल्यामुळे व तसेच औद्योगिक उत्पादनामुळे जवळ जवळ १ हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. तत्पुर्वी कायनेटीक कंपनीच्या आर्थिक परिस्थितीमुळे कामगारांना स्वच्छा निवृत्ती घ्याव्या लागल्या होत्या तसेच कामगारांच्या नविन वेतनवाढीचे ॲग्रीमेंटही थांबले होते. जकात माफी दिल्यामुळे अनेक नगरशहरातील बेकारांना भविष्यात काम मिळणार आहे व कंपनीला नफा झाला तर शहराचा विकासच होणार आहे. तरी सभागृहाने सदरचा विषय मंजूर करावा.

मा.श्री.गारुडकर :- कायनेटीक कंपनीच्या नॅनो गिअरबॉक्स जकात माफीचा विषय सभेपुढे आलेला आहे. कंपनीमुळे सन १९७२ पासुन शहरामध्ये अनेकांना रोजगार मिळालेला आहे. कंपनीने नॅनो कारच्या गिअरबॉक्सवर जकात माफीसाठी प्रस्ताव दिलेला आहे. कंपनीच्या उत्पादनामध्ये कामगारांचा मोठा हातभार लागलेला आहे. व कंपनी बाबतही काही कामगारांच्या तक्रारी आहेत. काही कर्मचा-यांनी व्ही.आर.एस.घेतलेल्या आहेत व काही कामगारांना आत्महत्याही करावी लागली आहे व मानवाधिकार संघटनेकडे अर्ज केलेले आहेत. शहराचा विकास होणार असेल तर जकात माफी जरुर करावी. मात्र कंपनीतर्फे किती रक्कमेची यंत्रसामुग्री आयात होणार आहे याचा उल्लेख केलेला नाही. ती ७० ऐवजी १४० कोटीची नाही कशावरुन यावर नियमाप्रमाणे ३ टक्के जकात ऐवजी दीड टक्का मशिनरीवर व कच्च्या मालावर १ टक्का ऐवजी १/२ टक्का जकात आकारावी.

मा.श्री.लोंढे :- या प्रकल्पामुळे १ हजार लोकांना रोजगार मिळत असल्याने व चांगले काम असल्याने जकात माफी द्यावी मात्र स्थानिक लोकांना काम द्यावे तसेच श्री.गारुडकर नगरसेवक यांनी सुचविल्याप्रमाणे निर्णय द्यावा.

मा.श्री.कावरे :- फिरोदिया कुटुंबाने १९७० साली कायनेटीक कंपनीची उभारणी केली व ब-याचशा कामगारांना रोजगार दिलेला होता. त्यामुळे या कंपनीस गिअर बॉक्स वरती जकात माफी करावी. त्यामुळे इतरही उद्योगांना रोजगार उपलब्ध होवू शकेल.

मा.श्री.फुलसौंदर :- ३६ वर्षापासुन कायनेटीक कंपनीने अहमदनगर शहराची लुना सिटी म्हणुन ओळख करुन दिलेली आहे. त्यानंतर बरीच औद्योगिक स्थित्यंतरे झाली. कर्मचारी कमी केले उत्पादनही कमी झाले होते. त्यानंतर काही कामगारांना सेवानिवृत्ती घ्यावी लागली परंतु कायनेटीक कंपनीचे आणि अहमदनगर शहराचे जिव्हाळयाचे नाते आहे. त्यामुळे जकाती बाबत निर्णय महानगरपालिकेने घ्यावा. अशा कंपनीला आपण अद्याप व्यवस्थित पिण्याचे पाणी पुरवु शकलो नाही सुविधा देण्याचे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. व पुढील भविष्याचा वेध घेवून एल ॲण्ड टी कंपनीने ज्याप्रमाणे महानगरपालिकेला भगतसिंग उद्यान उभेकरुन दिले आहे. त्याप्रमाणे कायनेटीक कंपनीकडुनही असे काम करुन घ्यावे. तरी कंपनीस संपुर्ण जकात माफी द्यावी त्यामुळे नगर शहराच्या उत्पन्नात भरच पडणार आहे. सभागृहाने मदत करण्यास काहीच हरकत नाही.

मा.श्री.गिरवले :- कायनेटीक इंजिनिअरींग प्रा.लि., यांनी नॅनो कारच्या गिअर बॉक्स उत्पादनासाठी यंत्रसामुग्रीवर व कच्च्या मालावर जकात माफी मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. कंपनी जवळ जवळ ३५ वर्षापासुन नगर शहरात चालू आहे. यापुर्वी कंपनीने नगरपालिका व महानगरपालिकेला मोठया प्रमाणात जकात भरलेली आहे कंपनी यापुर्वी लुना मोपेडचे उत्पादन करीत होती. परंतु काळाच्या ओघात नविन मॉडेंल्सचे उत्पादन होवू लागल्याने लुना मोपेड मागे पडली कंपनीवरसंकटे आली. अशाही परिस्थितीत कंपनीने आपला कारखाना चालू ठेवलेला आहे. नगर शहराचा विकास केला तर नगर शहर हे औद्योगिक दृष्टीने मागे पडलेले आहे. याचा विचार करता कंपनीचा नवा प्रोजेक्ट मध्ये ८०० ते ८५० कामगारांना काम मिळणार आहे. त्यामुळे अशा कंपनीला जकात माफी दिली पाहिजे. अशी आमची विनंती राहील. जकात माफी खालील मुद्यांवर असावी.

१. ५ वर्ष जकात माफी द्यावी.

२. २५ वर्ष कंपनीने स्थलांतर करु नये.

३. स्थानिक भुमीपूत्र मराठी लोकांना प्राधान्य द्यावे.

४. स्पेअर पार्ट लघुउद्योगामध्ये मराठी माणसांना प्राधान्य द्यावे.

त्याचप्रमाणे वसुली विभागाकडील थकबाकी बाबत तडजोड करावी.

इत्यादी सर्व शर्ती व अटी यांचा समावेश करुन त्यांच्या प्रस्तावाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा व जकात माफी द्यावी असे सुचविले.

मा.श्री.अनंत जोशी :- कायनेटीक इंजिनिअरींगचा जकात माफीचा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मी मा.सदस्यांनी व्यक्त केलेल्या मताशी सहमत आहे. अहमदनगर येथील औद्योगिक क्षेत्रामध्ये सध्या जकात नाही. सदरच्या कायनेटीक कंपनीला जकात माफी दिल्यानंतर त्याचा फायदा इतरही छोट्या कारखानदारांना होणार आहे.

तथापि कायनेटीक कंपनीचे पहिल्या वर्षी किती उत्पन्न मिळणार आहे. तसेच दुस-या वर्षी किती उत्पन्न मिळणार आहे याची आकडेवारी उपलब्ध झालेली नाही ती उपलब्ध होणे आवश्यक आहे. जकात माफी देण्याबाबत आम्ही सहमत राहू यामुळे नगर शहरामध्ये रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शहरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे बंधन टाकण्यांत यावे अशी विनंती.

मा.श्री.कृ.द.जाधव :- कायनेटीक कंपनी मार्फत नॅनो प्रकल्पासाठी मशिनरी व कच्चा माल इत्यादी आयातीवर महानगरपालिका संपुर्ण जकात माफी कायदेशिर देवू शकते किंवा नाही. याचा खुलासा करुन सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन मा.श्री.गारुडकर सदस्य यांनी सूचविलेल्या प्रस्तावाप्रमाणे मशिनरीवर ३ टक्के ऐवजी दीड टक्का व कच्च्या मालावर एक टक्क्याऐवजी अर्धा टक्का जकात माफी करावी. याप्रमाणे आमचा विरोध रहाणार नाही.

मा.श्री.वाकळे :- कंपनीने पत्रात उल्लेख केला की, नॅनो प्रकल्पासाठी जकात माफी द्यावी व पर्यायाने नगर शहराचाच विकास करुन घ्यावा असे सांगितले. नियमानुसार महानगरपालिका जकात माफी देवू शकत  नाही. जकात नियमामध्ये दारिद्रय रेषेखालील वापरात असलेल्या १० जकात वस्तुंनाच फक्त जकात माफी देण्यासाठी तरतुद आहे.

कंपनीकडे महानगरपालिकेचे संकलीत कराची जी थकबाकी आहे त्याच्या वसुली बाबत काय कार्यवाही आहे याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा करावा. सदरची बाकी जवळजवळ दीड कोटींची आहे.

श्री.पवळे यांनी यापुर्वी कंपनीला दिलेल्या जकात माफीचा खुलासा केला तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १४६ (२) अन्वये खुलासा केला.

मा.उपमहापौर :- शहराच्या दृष्टीने विचार करतांना हा एक ऐतिहासिक प्रस्ताव दिलेला आहे तरी याबाबत निर्णय घेवू शकतो.

मा.श्री.नामदेव पवार :- महानगरपालिकेने शहराच्या व महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने याकडे पाहिले पाहिजे. या प्रस्तावा सोबत मा.आयुक्त यांनी आपले मत द्यावयास पाहिजे होते. महानगरपालिका सभागृहास अधिकार असेल तर हा ठराव शासनाकडे का पाठवायचा. सभागृहाने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर शासन हे मान्य करील असे नाही. शासनाने मान्य केले नाही तर याची संपूर्ण जबाबदारी या सभागृहावर असणार आहे काय ? कच्च्या मालावर एक टक्का जकात ५० पैसे असावी व मशिनरीवर ५० टक्के असावी असे सुचविले. कायनेटीक इंजिनिअरींग कंपनीने अंशतः जकात माफ करावे असे म्हटले आहे.

तरी वरील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री.कावरे :- संपुर्ण जकात माफ करावी.

मा.श्री.घुले शं.ह. :- अतिशय महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा झालेली आहे. भारत हा चीन देशाच्या खालोखाल मोठी लोकसंख्या असलेला दुसरा देश आहे. बरीच अर्थव्यवस्था ही शेती धंद्यावर अवलंबुन आहे. यामुळे शेती ऐवजी मोठ्या प्रमाणात औद्योगिकरणाचे मोठे प्रकल्प उद्योग सुरु झाले. स्वातंत्र्याच्या वर्षामध्ये देशाची लोकसंख्या ३५ कोटी होती. आता ही लोकसंख्या जवळजवळ ११० कोटी पर्यंत गेलेली आहे. शेतीवर अवलंबुन असणारांची संख्या कमी झालेली आहे. व औद्योगिकरणावर भर दिल्यामुळे मुंबई पुणे औरंगाबाद येथील उद्योग वाढले. त्यानंतर सर्वत्र औद्योगिकरण झाल्यामुळे कायनेटीक कंपनीने सुध्दा सर्व सामान्यांसाठी  लुना मोपेड गाडी दिलेली होती. त्याचप्रमाणे टाटा कंपनीच्या सहकार्याने सर्व सामान्यांना १ लाख रुपयांची नॅनो कार देण्याचा संकल्प केलेला आहे. त्या मोटारीचे गिअर बॉक्स करण्याचे काम कायनेटीक कंपनीला मिळालेले आहे. जकात माफी देण्याचा प्रश्न तेवढयापुरता आहे.

कंपनीच्या प्रॉपर्टी टॅक्स बाबत कोर्टामध्ये केस प्रलंबित आहे. कोर्ट निकालावर तो निकाल आपल्यावर बंधनकारक आहे. त्यामुळे ही थकबाकीची रक्कम वसुल पात्र आहे.

जकात माफी बाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्तांना नाही तर सभागृहाला आहे. तसेच हा निर्णय सभागृहाने घ्यावा असे सुचविले. सदर बाबतचा ठराव महानगरपालिकेस करुन घ्यावायाचा आहे. व शासनाकडेस पाठविण्याचा आहे. शासकीय पातळीवर ते प्रयत्न करणार आहेत. व्हीडीओकॉन कंपनीलाही अशा प्रकारे पत्र आल्यास जकात माफी देण्याची विनंती आहे. पिंपरीचिंचवड औद्योगिक क्षेत्रामध्ये ७ वर्ष टाटा कंपनीला जकात माफी देण्यांत आलेली आहे.

कायनेटीक कंपनीचे महानगरपालिकेकडे १ कोटी ७० लाख इतके डिपॉझिट जमा आहे.

मा.महापौर :- सदरचा प्रकल्प हा शहरात आला तर शहराची औद्योगिक वाढ होणार आहे. तसेच शहराच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच जकात माफी केल्यानंतर ७० ते ८० टक्के कर्मचारी नगर शहरातीलच असणार आहेत. सदर कंपनीस जकात माफी देतांना आपण पुर्णपणे नॅनो प्रकल्पासाठीच जकात माफी देत आहोत.प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस पाठविल्यानंतर व मंजुरी आल्यानंतर जकात माफी होवू शकेल. तेव्हा आपण याबाबतीत कशा प्रकारे मदत करु शकतो ते पहाणे आवश्यक आहे. सध्या याबाबतीत आपणांस कोणतेही उत्पन्न मिळत नाही. संपुर्ण जकात माफी दिल्यानंतर व शासनाकडुन निर्णय येईपर्यंत नियमाप्रमाणे संयुक्त खात्यावर जकात भरुन घ्यावी.

मा.श्री.भानुदासजी कोतकर :- कायनेटीक इंजिनिअरींग लि. या कंपनीच्या प्रस्तावावर व सभागृहापुढे आलेल्या विषयावर अनेक सदस्यांनी चर्चा केलेली आहे. सदर बाबतीत ठराव शासनाकडेस पाठविल्यानंतर तो पर्यंत महानगरपालिका काय करणार आहे. याबाबत खुलासा करावा. शासनाची मंजूर आल्यानंतरच मशिनरी आयात होणार आहे काय.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविल्या नंतर व शासनाची मंजूरी मिळाल्यानंतरच आपणाला अशा प्रकारे जकात माफीची सवलत देता येईल. कोणत्याही बाबतीत अशा प्रकारे जकात नियमात सुधारणा होत असल्यामुळे राज्य शासनाची मंजूरी घेणे क्रमप्राप्त आहे. शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. तोपर्यंत कंपनीने जकातीची रक्कम महानगरपालिकेकडे अनामत ठेवली पाहिजे व डिपॉझिट केली पाहिजे असे सांगितले. तसेच कायनेटीक कंपनीच्या घरपट्टी वसुली बाबत संयुक्त बैठक घेवून त्याबाबतचा वाद मिटविण्यांत येईल असे सांगितले. १० दिवसात बैठक लावण्यांत येईल.

मा.श्री.भानुदासजी कोतकर :- कायनेटीक कंपनीच्या आयात होणा-या मशिनरीवर १०० टक्के जकात माफ करावी. व कच्च्या मालावर अर्धा टक्का जकात माफ करावी. या प्रस्तावास सर्वांनी पाठींबा द्यावा अशी विनंती.

--*--

**ठराव :** अहमदनगर शहरामध्ये कायनेटिक उद्योग समुहाच्या वतीने नविन टाटा नॅनो कार प्रकल्पासाठी आयात होणा-या यंत्रसामुग्री , कच्चा माल, स्पेअर पार्टस यासाठी जकात माफी मिळणे बाबत मे.कायनेटिक इंजिनिअरींग लि., अहमदनगर यांनी केलेल्या जकात माफी सवलती बाबतच्या अर्जावर सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली त्यात नॅनो कार साठी गिअर व शाफ्ट उत्पादनाचा प्रकल्प कायनेटिक इंजिनिअरींग लि., अहमदनगर यांचे माध्यमातुन अहमदनगर शहरामध्ये येत आहे. या प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होवुन बेरोजगारांना रोजगार मिळणार

आहे. तसेच शहरातील इतर लघु उद्योजक यांना यामाध्यमातुन काम करण्याची संधी प्राप्त होणार आहे. शहरामध्ये नविन प्रकल्पाची उभारणी झाल्याने दळणवळण व औद्योगिक पोषक वातावरण निर्माण होण्यास निश्चित मदत होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता सदर प्रकल्पासाठी ही सभा पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**(१)** नविन टाटा नॅनो कार प्रकल्पासाठी आयात होणा-या यंत्रसामुग्री , स्पेअर पार्टस या मालावर प्रचलित दरानुसार ३ % जकात कर घेतला जातो. त्याऐवजी या मालावर जकात माफी देण्यात येत आहे.

**(२)** तसेच या प्रकल्पासाठी आयात होणारा कच्चा माल **अ)** फोर्जिंग्ज **ब)** टर्न ब्लॅन्क **क)** विविध प्रकारचे ऑईल्स **ड)** पॅकिंग मटेरियल, प्लॅस्टिक ट्रे व बीन या मालावरच ०.५० % जकात आकारणी करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त दोन्हीही सवलतींचा कालावधी ठरावाच्या दिनांकापासुन पाच वर्षापर्यंत राहील. मात्र सदर प्रस्ताव मा.शासनाकडेस अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात यावा व मा.शासनाचे मंजुरीनंतर अंमलबजावणी करणेत यावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री. भानुदास एकनाथ कोतकर.<br>
अनुमोदक : मा.श्री.आसाराम हरिभाऊ कावरे.<br>
ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

प्रस्तावाचा विषय : अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील मंजुर रेखांकनामधील ओपन स्पेस (मोकळया जागा ) हस्तांतरीत करून घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर.

प्रस्तावाचा मजकूर : अहमदनगर शहराची सन १९९९ मध्ये हद्दवाढ करण्यात येवून या नविन हद्दीत आजुबाजुच्या परिसरातील एकुण १२ गांवे समाविष्ठ झालेली आहेत. या १२ गांवामध्ये पुर्वी पासुनच मोठ्या प्रमाणात विकास झालेला आहे. या सर्व गांवामध्ये मोठ्या प्रमाणावर जमिनी रेखांकन करुन बिनशेती झालेल्या आहेत. त्यापैकी अनेक रेखांकनातील भुखंडावर बांधकामे देखिल झालेली आहेत. वास्तविक अशा शेत जमिनी रेखांकन करुन बिनशेती करताना या रेखांकनातील रस्ते व खुल्या जागा स्थानिक प्राधिकरणाकडे म्हणजेच तत्कालीन ग्रामपंचायतीकडे रुपये १/- या नाममात्र किमतीस हस्तांतरीत होणे आवश्यक होते. मात्र याबाबतीत संबंधित विकासक आणि तत्कालीन ग्रामपंचायती उदासीन राहिल्याने या मंजुर रेखांकनातील खुल्या जागा व रस्ते स्थानिक प्राधिकरणाकडे हस्तांतरीत झाल्या नाहीत.

तत्कालीन अहमदनगर नगरपालिकेमध्ये देखिल सन १९९५ पर्यंत अशा खुल्या जागा व रस्ते तत्कालीन नगरपालिकेकडे वर्ग करुन घेण्यामध्ये उदासीनता राहिल्याने सन १९९५ पुर्वीच्या मंजुर रेखांकनातील अनेक रस्ते व खुल्या जागा तत्कालीन नगरपालिकेच्या नावावर झाल्या नाहीत. सन १९९६ नंतर मात्र या कार्यालयीन पध्दतीत सुधारणा करुन रेखांकनास तात्पुरती व अंतिम अशा दोन स्वतंत्र मंजुरी देण्याची पध्दत अंमलात आली त्यामुळे रेखांकनास अंतिम मंजुरी देण्यापुर्वी या रेखांकनातील रस्ते व खुल्या जागा नाममात्र किमतीस ताब्यात घेण्याची कार्यवाही कटाक्षाने अंमलात आली.

अशा रितीने महानगरपालिका हद्दीत नव्याने समाविष्ठ झालेल्या गांवामधील तसेच सन १९९५ पुर्वी तत्कालीन नगरपालिका हद्दीतील मंजुर रेखांकनातील खुल्या जागा व रस्ते महानगरपालिकेस हस्तांतरीत झाल्या नाहीत. अशा खुल्या जागा व रस्ते महानगरपालिकेकडे हस्तातरीत न झाल्याने विशेषत: खुल्या जागा विकसित करतांना मोठ्या अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तसेच विविध अनुदाने प्राप्त करतांना मोठ्या अडचणी येत आहेत. व्दिनोंद पध्दत (Double Entry Sistem ) या नावाने प्रचलित झालेल्या पध्दतीमुळे महानगरपालिकेच्या मालमत्तेच्या नोंदीस महत्व प्राप्त झालेले आहे. त्यासाठी देखिल मंजुर रेखांकनातील खुल्या जागा व रस्ते स्वत:च्या मालकीचे करुन घेणे आवश्यक आहे.

वास्तविक अहमदनगर शहर व आजुबाजुच्या परिसरासाठी 'अ' वर्ग नगरपालिकेसाठी असलेली विकास नियंत्रण नियमावली पुर्वी पासुन लागु आहे. यातील नियम क्र.१.४.३ अन्वये खुली जागा व रस्ते संबंधित विकासकाने स्थानिक प्राधिकरणास हस्तांतर करुन देणे हे त्या विकासकाने कसुर केलेला आहे. हे स्पष्ट आहे मात्र या रेखांकनाची संख्या विचारात घेता प्रत्यक्ष वैयक्तीक संपर्क साधुन अशा खुल्या जागा महानगरपालिकेस वर्ग करुन घेणे ही गोष्ट प्रत्यक्षात शक्य नाही. त्याकरीता हा प्रस्ताव मा.महासभेस सादर करण्यात येत आहे.

मा.महासभेस एकूण ७७९ रेखांकनाची सविस्तर यादी सादर करण्यात येत आहे. या यादीत जमिन मालकाचे नांव, सर्व्हे नंबर, खुल्या जागेचे क्षेत्र इत्यादी तपशिल दिलेला आहे. त्या सर्व जागा महानगरपालिकेस हस्तांतरीत करुन घेण्याचा निर्णय मा.महासभेने घेतल्यास तयाबाबतची जाहीर प्रसिध्दी करुन त्या हस्तांतराबाबत संबंधितांच्या हरकती व सुचना मागवण्यात येतील व या

हरकतीवर मा.आयुक्त संबंधितांना सुनावणी देतील व या सुनावणीच्या अभिप्रायासह हा प्रस्ताव पुन्हा मा.महासभेस अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात येईल. व त्यानंतर मा.महासभा या सर्व जागा हस्तांतरीत करुन घेण्याबाबत अंतिम निर्णय घेवू शकेल.

सबब सदर प्रस्ताव मंजुरीसाठी व संबंधितांच्या हरकती / सूचना मागविण्यासाठी मा.महासभेस सादर करणे योग्य होईल असे मत आहे. आदेशार्थ सादर.

यावर मा.महापौर साहेब यांचा अभिप्राय की, चर्चा झाली महासभेपुढे ठेवणे.

यावर मा. उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, "अ " प्रस्तावित महासभेकडे पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर.

अशाबाबतचा ऑफिस रिपोर्ट मा.महापौर साहेब, मा.उपायुक्त (सा) यांचे अभिप्रायासह पुढील निर्णयास्तव मा.खास सभेपुढे ठेविला.

--*--

**ठराव :** अहमदनगर महानगरपालिका हद्यीतील प्रशासनाने सादर केलेल्या मंजुर रेखांकनातील मोकळया जागा महानगरपालिकेकडे हस्तांतर करून घेण्यास, त्या हस्तांतराबाबत संबंधितांच्या हरकती सुचना मागविण्यास व आलेल्या हरकतींवर संबंधितांना सुनावणी देवुन सुनावणीच्या अभिप्रायासह संपुर्ण प्रस्ताव महासभेपुढे अंतिम मंजुरीसाठी ठेवण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक : मा.श्री. विनित पाउलबुधे

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

सही /-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ९ दिनांक : १८-०८-२००८.

---

प्रस्तावाचा विषय : मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ७ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** नविन टाटा नॅनो कार प्रकल्पासाठी आयात होणा-या यंत्रसामुग्री, कच्चा माल, स्पेअरपार्ट इ.साठी जकात माफी मिळणे बाबत कायनेटीक इंजिनिअरींग लि.,अहमदनगर यांचे दिनांक ३०-०६-२००८ रोजीचे पत्र व त्यावरील ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर.

--*--

**ठराव :**अहमदनगर शहरामध्ये कायनेटिक उद्योग समुहाच्या वतीने नविन टाटा नॅनो कार प्रकल्पासाठी आयात होणा-या यंत्रसामुग्री , कच्चा माल, स्पेअर पार्टस यासाठी जकात माफी मिळणे बाबत मे.कायनेटिक इंजिनिअरींग लि., अहमदनगर यांनी केलेल्या जकात माफी सवलती बाबतच्या अर्जावर सभेमध्ये सविस्तर चर्चा झाली त्यात नॅनो कार साठी गिअर व शाफ्ट उत्पादनाचा प्रकल्प कायनेटिक इंजिनिअरींग लि., अहमदनगर यांचे माध्यमातुन अहमदनगर शहरामध्ये येत आहे. या प्रकल्पासाठी मोठया प्रमाणात रोजगार निर्मिती होवुन बेरोजगारांना रोजगार मिळणार आहे. तसेच शहरातील इतर लघु उद्योजक यांना यामाध्यमातुन काम करण्याची संधी प्राप्त होणार आहे. शहरामध्ये नविन प्रकल्पाची उभारणी झाल्याने दळणवळण व औद्योगिक पोषक वातावरण निर्माण होण्यास निश्चित मदत होणार आहे. या सर्व बाबींचा विचार करता सदर प्रकल्पासाठी ही सभा पुढील प्रमाणे निर्णय घेत आहे.

**(१)** नविन टाटा नॅनो कार प्रकल्पासाठी आयात होणा-या यंत्रसामुग्री , स्पेअर पार्टस या मालावर प्रचलित दरानुसार ३ % जकात कर घेतला जातो. त्याऐवजी या मालावर जकात माफी देण्यात येत आहे.

**(२)** तसेच या प्रकल्पासाठी आयात होणारा कच्चा माल **अ)** फोर्जिंग्ज **ब)** टर्न ब्लॅन्क **क)** विविध प्रकारचे ऑईल्स **ड)** पॅकिंग मटेरियल, प्लॅस्टिक ट्रे व बीन या मालावरच ०.५० % जकात आकारणी करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

उपरोक्त दोन्हीही सवलतींचा कालावधी ठरावाच्या दिनांकापासुन पाच वर्षापर्यंत राहील. मात्र सदर प्रस्ताव मा.शासनाकडेस अंतिम मंजुरीसाठी सादर करण्यात यावा व मा.शासनाचे मंजुरीनंतर अंमलबजावणी करणेत यावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

सुचक : मा.श्री. भानुदास एकनाथ कोतकर.
अनुमोदक : मा.श्री.आसाराम हरिभाऊ कावरे.
ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : १ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** दिनांक १५-०३-२००८ व दि.१२-०५-२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा. सर्वसाधारण व मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणे बाबत.

--*--

**ठराव :** दिनांक १५-०३-२००८ व दि.१२-०५-२००८ रोजी झालेल्या अनुक्रमे मा. सर्वसाधारण व मा.खास सभेचे इतिवृत्त कायम करणेस ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक : मा.श्री. कृ.द.जाधव

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ३ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** प्रभाग क्रमांक १२ झोपडी कँन्टीन जवळील माउली आर्केड ते टि.व्ही.सेंटर रस्त्यास " सेंट बिशप लॉईड रस्ता " असे नांव देणे बाबत मा.श्री.जोशी अनंत सुर्यकांत,नगरसेवक यांची दिनांक ३-०८-२००७ ची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. जोशी अनंत सुर्यकांत

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ४ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** प्रभाग क्रमांक ५ मधील इंम्पिरिअल चौका समोरील श्री छत्रपती शिवाजी महाराज पुतळा येथील चौकास " श्री छत्रपती शिवाजी महाराज चौक " असे नामकरण करणे बाबत मा.श्री.भानुदास एकनाथ कोतकर, नगरसेवक यांची दि.७-०८-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

--*--

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. भानुदास एकनाथ कोतकर

अनुमोदक : मा.श्री. किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ५ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** प्रभाग क्रमांक १६ मधील शनिगल्ली झेंडिगेट भागातील ब्राम्हण कारंजा जवळील पैमाना हॉटेल ते पत्रकार मन्सुर शेख यांच्या घरापर्यंत रस्त्याला " पैगंबरवासी अजिजभाई चष्मावाला मार्ग " असे नांव देणे बाबत मा.श्री.बोरा किशोर हिम्मतलाल , नगरसेवक यांची दिनांक ९-०६-२००८ रोजीची यादी व त्यावरील ऑफिस रिपोर्ट.

-- * --

**ठराव :** ऑफिस रिपोर्ट मंजुर. खर्च मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. त्रिपाठी सुनिल चंद्रभुषण

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ६ दिनांक : २०-०८-२००८.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय :** सन २००८ -२००९ सालाकरीता वृक्ष प्राधिकरण समितीची रचना करणे बाबत ऑफिस रिपोर्ट मंजुरीस्तव सादर.

-- * --

**ठराव :** सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेनुसार सदर समितीवर सदस्य निवडणे बाबतचे अधिकार मा.महापौर ,अहमदनगर महानगरपालिका यांना देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री. किशोर डागवाले

अनुमोदक : मा.श्री.नामदेव पवार

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

प्रस्ताव क्रमांक : ८                                                   दिनांक : २०-०८-२००८.

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मंजुर रेखांकनामधील ओपन स्पेस (मोकळया जागा ) हस्तांतरीत करून घेणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयास्तव सादर.

--*--

**ठराव :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील प्रशासनाने सादर केलेल्या मंजुर रेखांकनातील मोकळया जागा महानगरपालिकेकडे हस्तांतर करून घेण्यास, त्या हस्तांतराबाबत संबंधितांच्या हरकती सुचना मागविण्यास व आलेल्या हरकतींवर संबंधितांना सुनावणी देवुन सुनावणीच्या अभिप्रायासह संपुर्ण प्रस्ताव महासभेपुढे अंतिम मंजुरीसाठी ठेवण्यास ही सभा मंजुरी देत आहे.

सुचक : मा.श्री. विनित पाउलबुधे

अनुमोदक : मा.श्री.किशोर डागवाले.

ठराव सर्वानुमते मंजुर.

महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

## दिनांक २०/०८/२००८ रोजीचे खास सभेची चर्चा :-

---*---

विषय क्रमांक : ७ :- जकात माफी संदर्भात.

मा.श्री.त्रिपाठी :- सदरचा विषय महानगरपालिका सभेपुढे घेण्यांत आल्याबद्दल हार्दिक अभिनंदन करतो. सन १९७३ सालापासुन ज्यावेळी महाराष्ट्रामध्ये दुष्काळी परिस्थिती होती अशा कालावधीमध्ये कायनेटीक इंजिनिअरींग यांनी लुना मोपेडच्या उत्पादनाच्या कारखान्याचे उद्‌घाटन केले. कायनेटीक कंपनी लुना मोपेडचे उत्पादन करीत असतांना केवळ या कंपनीच्या जकात रक्कमेवर तत्कालीन नगरपरिषदेच्या कर्मचा-यांचे पगार अवलंबुन होते. कायनेटीक कंपनी ही अखिल भारतात प्रसिध्द होती. या कंपनीचे भाउसाहेब फिरोदिया हे विधानसभेचे सभापती होते. अशा कंपनीला आता महानगरपालिके कडे त्यांच्या नविन नॅनो कार गिअर बॉक्ससाठी जकात माफी मिळण्या बाबत विनंती करावी लागत आहे. अहमदनगर शहराचा औद्योगिक विकास होण्यासाठी यापुर्वी हिरोहोंडा प्रकल्पही नगरमध्ये येणार होता परंतु तो प्रकल्प दुसरीकडे गेला. कायनेटीक कंपनीने संकट काळातही शहराला मदतच केलेली आहे. त्यांना जकात माफी दिल्यामुळे व तसेच औद्योगिक उत्पादनामुळे जवळ जवळ १ हजार लोकांना रोजगार मिळणार आहे. तत्पुर्वी कायनेटीक कंपनीच्या आर्थिक परिस्थितीमुळे कामगारांना स्वच्छा निवृत्ती घ्याव्या लागल्या होत्या तसेच कामगारांच्या नविन वेतनवाढीचे ॲग्रीमेंटही थांबले होते. जकात माफी दिल्यामुळे अनेक नगरशहरातील बेकारांना भविष्यात काम मिळणार आहे व कंपनीला नफा झाला तर शहराचा विकासच होणार आहे. तरी सभागृहाने सदरचा विषय मंजूर करावा.

मा.श्री.गारुडकर :- कायनेटीक कंपनीच्या नॅनो गिअरबॉक्स जकात माफीचा विषय सभेपुढे आलेला आहे. कंपनीमुळे सन १९७२ पासुन शहरामध्ये अनेकांना रोजगार मिळालेला आहे. कंपनीने नॅनो कारच्या गिअरबॉक्सवर जकात माफीसाठी प्रस्ताव दिलेला आहे. कंपनीच्या उत्पादनामध्ये कामगारांचा मोठा हातभार लागलेला आहे. व कंपनी बाबतही काही कामगारांच्या तक्रारी आहेत. काही कर्मचा-यांनी व्ही.आर.एस.घेतलेल्या आहेत व काही कामगारांना आत्महत्याही करावी लागली आहे व मानवाधिकार संघटनेकडे अर्ज केलेले आहेत. शहराचा विकास होणार असेल तर जकात माफी जरुर करावी. मात्र कंपनीतर्फे किती रक्कमेची यंत्रसामुग्री आयात होणार आहे याचा उल्लेख केलेला नाही. ती ७० ऐवजी १४० कोटीची नाही कशावरुन यावर नियमाप्रमाणे ३ टक्के जकात ऐवजी दीड टक्का मशिनरीवर व कच्च्या मालावर १ टक्का ऐवजी १/२ टक्का जकात आकारावी.

मा.श्री.लोंढे :- या प्रकल्पामुळे १ हजार लोकांना रोजगार मिळत असल्याने व चांगले काम असल्याने जकात माफी द्यावी मात्र स्थानिक लोकांना काम द्यावे तसेच श्री.गारुडकर नगरसेवक यांनी सुचविल्याप्रमाणे निर्णय द्यावा.

मा.श्री.कावरे :- फिरोदिया कुटुंबाने १९७० साली कायनेटीक कंपनीची उभारणी केली व ब-याचशा कामगारांना रोजगार दिलेला होता. त्यामुळे या कंपनीस गिअर बॉक्स वरती जकात माफी करावी. त्यामुळे इतरही उद्योगांना रोजगार उपलब्ध होवू शकेल.

मा.श्री.फुलसौंदर :- ३६ वर्षापासुन कायनेटीक कंपनीने अहमदनगर शहराची लुना सिटी म्हणुन ओळख करुन दिलेली आहे. त्यानंतर बरीच औद्योगिक स्थित्यंतरे झाली. कर्मचारी कमी केले उत्पादनही कमी झाले होते. त्यानंतर काही कामगारांना सेवानिवृत्ती घ्यावी लागली परंतु कायनेटीक कंपनीचे आणि अहमदनगर शहराचे जिव्हाळयाचे नाते आहे. त्यामुळे जकाती बाबत निर्णय महानगरपालिकेने घ्यावा. अशा कंपनीला आपण अद्याप व्यवस्थित पिण्याचे पाणी पुरवु शकलो नाही सुविधा देण्याचे महानगरपालिकेचे कर्तव्य आहे. व पुढील भविष्याचा वेध घेवून एल

ॲण्ड टी कंपनीने ज्याप्रमाणे महानगरपालिकेला भगतसिंग उद्यान उभेकरुन दिले आहे. त्याप्रमाणे कायनेटीक कंपनीकडुनही असे काम करुन घ्यावे. तरी कंपनीस संपुर्ण जकात माफी द्यावी त्यामुळे नगर शहराच्या उत्पन्नात भरच पडणार आहे. सभागृहाने मदत करण्यास काहीच हरकत नाही.

मा.श्री.गिरवले :- कायनेटीक इंजिनिअरींग प्रा.लि., यांनी नॅनो कारच्या गिअर बॉक्स उत्पादनासाठी यंत्रसामुग्रीवर व कच्च्या मालावर जकात माफी मिळण्याबाबत विनंती केलेली आहे. कंपनी जवळ जवळ ३५ वर्षापासुन नगर शहरात चालू आहे. यापुर्वी कंपनीने नगरपालिका व महानगरपालिकेला मोठया प्रमाणात जकात भरलेली आहे कंपनी यापुर्वी लुना मोपेडचे उत्पादन करीत होती. परंतु काळाच्या ओघात नविन मॉडेल्सचे उत्पादन होवू लागल्याने लुना मोपेड मागे पडली कंपनीवरसंकटे आली. अशाही परिस्थितीत कंपनीने आपला कारखाना चालू ठेवलेला आहे. नगर शहराचा विकास केला तर नगर शहर हे औद्योगिक दृष्टीने मागे पडलेले आहे. याचा विचार करता कंपनीचा नवा प्रोजेक्ट मध्ये ८०० ते ८५० कामगारांना काम मिळणार आहे. त्यामुळे अशा कंपनीला जकात माफी दिली पाहिजे. अशी आमची विनंती राहील. जकात माफी खालील मुद्यांवर असावी.

१. ५ वर्ष जकात माफी द्यावी.

२. २५ वर्ष कंपनीने स्थलांतर करु नये.

३. स्थानिक भुमीपूत्र मराठी लोकांना प्राधान्य द्यावे.

४. स्पेअर पार्ट लघुउद्योगामध्ये मराठी माणसांना प्राधान्य द्यावे.

त्याचप्रमाणे वसुली विभागाकडील थकबाकी बाबत तडजोड करावी.

इत्यादी सर्व शर्ती व अटी यांचा समावेश करुन त्यांच्या प्रस्तावाचा सहानुभूतीपूर्वक विचार करावा व जकात माफी द्यावी असे सुचविले.

मा.श्री.अनंत जोशी :- कायनेटीक इंजिनिअरींगचा जकात माफीचा अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे. मी मा.सदस्यांनी व्यक्त केलेल्या मताशी सहमत आहे. अहमदनगर येथील औद्योगिक क्षेत्रामध्ये सध्या जकात नाही. सदरच्या कायनेटीक कंपनीला जकात माफी दिल्यानंतर त्याचा फायदा इतरही छोट्या कारखानदारांना होणार आहे.

तथापि कायनेटीक कंपनीचे पहिल्या वर्षी किती उत्पन्न मिळणार आहे. तसेच दुस-या वर्षी किती उत्पन्न मिळणार आहे याची आकडेवारी उपलब्ध झालेली नाही ती उपलब्ध होणे आवश्यक आहे. जकात माफी देण्याबाबत आम्ही सहमत राहू यामुळे नगर शहरामध्ये रोजगार उपलब्ध होणार आहे. त्यामुळे शहरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध करुन देण्याचे बंधन टाकण्यांत यावे अशी विनंती.

मा.श्री.कृ.द.जाधव :- कायनेटीक कंपनी मार्फत नॅनो प्रकल्पासाठी मशिनरी व कच्चा माल इत्यादी आयातीवर महानगरपालिका संपुर्ण जकात माफी कायदेशिर देवू शकते किंवा नाही. याचा खुलासा करुन सर्व बाबींचा सांगोपांग विचार करुन मा.श्री.गारुडकर सदस्य यांनी सूचविलेल्या प्रस्तावाप्रमाणे मशिनरीवर ३ टक्के ऐवजी दीड टक्का व कच्च्या मालावर एक टक्क्याऐवजी अर्धा टक्का जकात माफी करावी. याप्रमाणे आमचा विरोध रहाणार नाही.

मा.श्री.वाकळे :- कंपनीने पत्रात उल्लेख केला की, नॅनो प्रकल्पासाठी जकात माफी द्यावी व पर्यायाने नगर शहराचाच विकास करुन घ्यावा असे सांगितले. नियमानुसार महानगरपालिका जकात माफी देवू शकत नाही. जकात नियमामध्ये दारिद्रय रेषेखालील वापरात असलेल्या १० जकात वस्तुंनाच फक्त जकात माफी देण्यासाठी तरतुद आहे.

कंपनीकडे महानगरपालिकेचे संकलीत कराची जी थकबाकी आहे त्याच्या वसुली बाबत काय कार्यवाही आहे याबाबत मा.आयुक्त यांनी खुलासा करावा. सदरची बाकी जवळजवळ दीड कोटींची आहे.

श्री.पवळे यांनी यापुर्वी कंपनीला दिलेल्या जकात माफीचा खुलासा केला तसेच मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ कलम १४६ (२) अन्वये खुलासा केला.

मा.उपमहापौर :- शहराच्या दृष्टीने विचार करतांना हा एक ऐतिहासिक प्रस्ताव दिलेला आहे तरी याबाबत निर्णय घेवू शकतो.

मा.श्री.नामदेव पवार :- महानगरपालिकेने शहराच्या व महानगरपालिकेच्या हिताच्या दृष्टीने याकडे पाहिले पाहिजे. या प्रस्तावा सोबत मा.आयुक्त यांनी आपले मत द्यावयास पाहिजे होते. महानगरपालिका सभागृहास अधिकार असेल तर हा ठराव शासनाकडे का पाठवायचा. सभागृहाने प्रस्ताव मंजूर केल्यानंतर शासन हे मान्य करील असे नाही. शासनाने मान्य केले नाही तर याची संपूर्ण जबाबदारी या सभागृहावर असणार आहे काय ? कच्च्या मालावर एक टक्का जकात ५० पैसे असावी व मशिनरीवर ५० टक्के असावी असे सुचविले. कायनेटीक इंजिनिअरींग कंपनीने अंशतः जकात माफ करावे असे म्हटले आहे.

तरी वरील प्रमाणे ठराव मंजूर करण्यांत यावा.

मा.श्री.कावरे :- संपुर्ण जकात माफ करावी.

मा.श्री.घुले शं.ह. :- अतिशय महत्वाच्या विषयावर सभागृहात चर्चा झालेली आहे. भारत हा चीन देशाच्या खालोखाल मोठी लोकसंख्या असलेला दुसरा देश आहे. बरीच अर्थव्यवस्था ही शेती धंद्यावर अवलंबुन आहे. यामुळे शेती ऐवजी मोठ्या प्रमाणात औद्योगिकरणाचे मोठे प्रकल्प उद्योग सुरु झाले. स्वातंत्र्याच्या वर्षामध्ये देशाची लोकसंख्या ३५ कोटी होती. आता ही लोकसंख्या जवळजवळ ११० कोटी पर्यंत गेलेली आहे. शेतीवर अवलंबुन असणारांची संख्या कमी झालेली आहे. व औद्योगिकरणावर भर दिल्यामुळे मुंबई पुणे औरंगाबाद येथील उद्योग वाढले. त्यानंतर सर्वत्र औद्योगिकरण झाल्यामुळे कायनेटीक कंपनीने सुध्दा सर्व सामान्यांसाठी लुना मोपेड गाडी दिलेली होती. त्याचप्रमाणे टाटा कंपनीच्या सहकार्याने सर्व सामान्यांना १ लाख रुपयांची नॅनो कार देण्याचा संकल्प केलेला आहे. त्या मोटारीचे गिअर बॉक्स करण्याचे काम कायनेटीक कंपनीला मिळालेले आहे. जकात माफी देण्याचा प्रश्न तेवढयापुरता आहे.

कंपनीच्या प्रॉपर्टी टॅक्स बाबत कोर्टामध्ये केस प्रलंबित आहे. कोर्ट निकालावर तो निकाल आपल्यावर बंधनकारक आहे. त्यामुळे ही थकबाकीची रक्कम वसुल पात्र आहे.

जकात माफी बाबतचा धोरणात्मक निर्णय घेण्याचा अधिकार आयुक्तांना नाही तर सभागृहाला आहे. तसेच हा निर्णय सभागृहाने घ्यावा असे सुचविले. सदर बाबतचा ठराव महानगरपालिकेस करुन घ्यावायाचा आहे. व शासनाकडेस पाठविण्याचा आहे. शासकीय पातळीवर ते प्रयत्न करणार आहेत. व्हीडीओकॉन कंपनीलाही अशा प्रकारे पत्र आल्यास जकात माफी देण्याची विनंती आहे. पिंपरीचिंचवड औद्योगिक क्षेत्रामध्ये ७ वर्ष टाटा कंपनीला जकात माफी देण्यांत आलेली आहे.

कायनेटीक कंपनीचे महानगरपालिकेकडे १ कोटी ७० लाख इतके डिपॉझिट जमा आहे.

मा.महापौर :- सदरचा प्रकल्प हा शहरात आला तर शहराची औद्योगिक वाढ होणार आहे. तसेच शहराच्या उत्पन्नात वाढ होईल. तसेच जकात माफी केल्यानंतर ७० ते ८० टक्के कर्मचारी नगर शहरातीलच असणार आहेत. सदर कंपनीस जकात माफी देतांना आपण पुर्णपणे नॅनो प्रकल्पासाठीच जकात माफी देत आहोत.प्रस्ताव शासनाकडे मंजूरीस पाठविल्यानंतर व मंजुरी आल्यानंतर जकात माफी होवू शकेल. तेव्हा आपण याबाबतीत कशा प्रकारे मदत करु शकतो ते पहाणे आवश्यक आहे. सध्या याबाबतीत आपणांस कोणतेही उत्पन्न मिळत नाही. संपुर्ण जकात माफी दिल्यानंतर व शासनाकडुन निर्णय येईपर्यंत नियमाप्रमाणे संयुक्त खात्यावर जकात भरुन घ्यावी.

मा.श्री.भानुदासजी कोतकर :- कायनेटीक इंजिनिअरींग लि. या कंपनीच्या प्रस्तावावर व सभागृहापुढे आलेल्या विषयावर अनेक सदस्यांनी चर्चा केलेली आहे. सदर बाबतीत ठराव

शासनाकडेस पाठविल्यानंतर तो पर्यंत महानगरपालिका काय करणार आहे. याबाबत खुलासा करावा. शासनाची मंजूर आल्यानंतरच मशिनरी आयात होणार आहे काय.

यावर मा.आयुक्त यांनी खुलासा केला की, सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविल्या नंतर व शासनाची मंजूरी मिळाल्यानंतरच आपणाला अशा प्रकारे जकात माफीची सवलत देता येईल. कोणत्याही बाबतीत अशा प्रकारे जकात नियमात सुधारणा होत असल्यामुळे राज्य शासनाची मंजूरी घेणे क्रमप्राप्त आहे. शासनाच्या मंजुरीसाठी पाठविणे आवश्यक आहे. तोपर्यंत कंपनीने जकातीची रक्कम महानगरपालिकेकडे अनामत ठेवली पाहिजे व डिपॉझिट केली पाहिजे असे सांगितले. तसेच कायनेटीक कंपनीच्या घरपट्टी वसुली बाबत संयुक्त बैठक घेवून त्याबाबतचा वाद मिटविण्यांत येईल असे सांगितले. १० दिवसात बैठक लावण्यांत येईल.

मा.श्री.भानुदासजी कोतकर :- कायनेटीक कंपनीच्या आयात होणा-या मशिनरीवर १०० टक्के जकात माफ करावी. व कच्च्या मालावर अर्धा टक्का जकात माफ करावी. या प्रस्तावास सर्वांनी पाठींबा द्यावा अशी विनंती.

विषय क्रमांक ८ :- ओपन स्पेस जागा ताब्यात घेणे बाबत.

यावर श्री.धोंगडे यांनी खुलासा केला की, प्रस्ताव कायद्यानुसार अनिवार्य आहे. तसेच महानगरपालिकेकडे व्दीनोंद पध्दती सुरु होणार असल्यामुळे सर्व ओपन स्पेसची नोंदणी करणे आवश्यक आहे. या बाबतीत सुप्रीम कोर्टाचा निर्णय आलेला आहे. ओपन स्पेसवर अनधिकृत वापर होवू नये म्हणुन आपण कारवाई करु शकतो.

मा.श्री.वाकळे :- विषय कशासाठी सभागृहापुढे आणला आहे.

मा.आयुक्त :- ओपन स्पेस बाबत कंम्पौंड वॉल बाबत तात्काळ कार्यवाही करावी अशा सुचना दिल्या.

मा.महापौर :- ज्या मोकळया जागा आहेत त्यावर डी.पी.लावणे करीता जागा मोकळया सोडाव्यात.

मा.आयुक्त :- सर्व जागांच्या नोंदी घेण्याकरीता सेवानिवृत्त तहसिलदार यांची मदत घेवून जागा महानगरपालिकेच्या नावावर नोंद करुन घेण्याबाबत कार्यवाही करावी.

मा.श्री.विनीत पाअुलबुधे :- उपनगरातील ओपन स्पेस अतिक्रमणा बाबत तातडीने कार्यवाही करावी.